# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय गडचिरोली

**E-mail – nhmgadchiroli.cs@gmail.com**

## कंत्राटी पदभरती

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध कार्यक्रमामध्ये रिक्त असलेली ११ संवर्गातील खालीलप्रमाणे १०७ रिक्त पदे दिनांक २९/०६/२०२३ पर्यंतच्या कालावधीकरीता कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठी अर्हताप्राप्त इच्छूक उमेदवारांनी Google Form च्या माध्यमातून Online अर्ज भरुन ईमेलवर प्राप्त अर्जाची प्रिंट, शुल्काचा स्क्रिनशॉट व संपूर्ण दस्ताऐवजांसह पदासमोर नमुद दिनांकास थेट मुलाखतीस उपस्थित राहावे.

| अ. क्र. | मुळ पदाचे नांव | अंतर्गत पद | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | प्रवर्ग | मानधन (रुपये) | मुलाखतीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुपर स्पेशालीस्ट | कार्डीओलॉजीस्ट | १ | DM Cordiology | ST-1 | १,२५,०००/- | दिनांकः १९/०४/२०२३ वेळः सकाळी ०९ वाजता |
| | | नेफ्रोलॉजीस्ट | १ | DM Nephrology | Open-1 | | |
| २ | स्पेशालिस्ट | भुलतज्ञ | ६ | MD Anesthesia/ DA/ DNB | SC-4 ST-9 VJA-1 NTB-1 NTC-1 NTD-1 SBC-1 OBC-6 EWS-2 | ७५,०००/- | |
| | | स्त्रीरोगतज्ञ | ५ | MD/MS Gyn/ DGO/ DNB | | | |
| | | बालरोगतज्ञ | १० | MD Paediatric/ DCH/ DNB | | | |
| | | सर्जन | १ | MS General Surgery/ DNB | | | |
| | | फिजीशिअन/ कन्सलटंट मेडीसिन | २ | MD Medicine / DNB | | | |
| | | सायकॅट्रीस्ट | १ | MD Psychiatry/ DPM/ DNB | | | |
| | | ईएनटी सर्जन | १ | MS ENT/ DORL/ DNB | | | |
| ३ | वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस) | वैद्यकिय अधिकारी MBBS | २९ | MBBS with Registration of MMC | SC-4 ST-7 VJA-1 NTB-1 NTC-2 NTD-1 SBC-1 OBC-5 EWS-3 Open-4 | ६०,०००/- | |
| ४ | वैद्यकिय अधिकारी (आयुष-पदव्यूत्तर) | वैद्यकिय अधिकारी-पीजी | १ | PG Unani with MCIM Registration | OBC-1 | ३०,०००/- | दिनांकः २०/०४/२०२३ वेळः सकाळी ०९ वाजता |
| ५ | वैद्यकिय अधिकारी (आयुष-पदवीधर) | वैद्यकिय अधिकारी युनानी | २ | BUMS with MCIM Registration | VJA-1 NT-1 | २८,०००/- | |
| ६ | वैद्यकिय अधिकारी (आरबीएसके-पदवीधर) | वैद्यकिय अधिकारी (स्त्री/पुरुष) | १५ (पुरुष १०, महिला ५) | BAMS with MCIM Registration | ST-5 VJA-1 NTC-2 NTD-1 SBC-1 OBC-5 | २८,०००/- | |
| ७ | ऑडीओलॉजीस्ट | ऑडीओलॉजीस्ट | २ | Degree in Audiology | ST-1 Open-1 | २५,०००/- | |
| ८ | पाठयनिर्देशक | नर्सिंग टयूटर | १ | B.Sc Nursing with MNC Registration | ST-1 | २५,०००/- | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | स्टाफ नर्स | स्टाफ नर्स | १८ | GNM / B.Sc Nursing with Valid Registration of MNC | SC-1<br>ST-1<br>VJA-3<br>NTB-1<br>NTC-2<br>NTD-2<br>SBC-1<br>OBC-5<br>EWS-2 | २०,०००/- | दिनांक:<br>२१/०४/२०२३<br>वेळ: सकाळी<br>०९ वाजता |
| १० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ८ | DMLT (MSBTE Mumbai) | ST-4<br>VJA-1<br>NTB-1<br>NTC-1<br>NTD-1 | १७,०००/- | |
| ११ | तंत्रज्ञ | सीटी स्कॅन टेक्नीशियन | १ | 12th Science with diploma in relevant field | SC-1<br>VJA-1<br>NTC-1 | १७,०००/- | |
| | | डेंटल हायजेनिस्ट | २ | 12th Science and Diploma in Dental Hygienist Course. Registration with State Dental Council | | | |

## सर्वसाधारण अटी व शर्ती :-

१) इच्छूक व अर्हताधारक उमेदवारांकडून Google Form Link च्या माध्यमातून Online स्वरुपात अर्ज मागविण्यात येत असून उमेदवारांनी **https://forms.gle/Szvt5d9NkQDJmwRY9** या लिंक चा वापर करावयाचा आहे. सदर लिंक अर्ज भरण्याचा शेवटचा **दिनांक १७/०४/२०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** सुरु राहील.

२) Google Form Link च्या माध्यमातून Online स्वरुपात अर्ज सादर केल्यानंतर उमेदवारांच्या ईमेल वर Auto-Generated अर्जाची प्रत प्राप्त होईल. सदर अर्जाच्या प्रतीसह उमेदवारांची त्यांचे सर्व आवश्यक कागदपत्राच्या मुळ व स्वसाक्षांकित झेरॉक्स प्रती (Self Attested Xerox Copy) आणि शुल्क भरणा केलेल्या पावतीचा स्क्रीनशॉट/फोटो जोडून सदर अर्ज **वर दिलेल्या पदनिहाय दिनांकास "कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, कॉम्पलेक्स परिसर, गडचिरोली"** येथे थेट मुलाखतीकरीता हजर रहावे.

*उमेदवारांनी अर्ज सादर करतांना त्याचे अद्यावत असलेले मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी व पत्रव्यवहाराचा पत्ता अचुक नोंदवावे. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहिल, याची दक्षता घ्यावी.*

३) राखीव (मागास) प्रवर्गातील उमेदवारांनी भरती शुल्क **रुपये १००/-** व खुल्या (अमागास) प्रवर्गातील उमेदवारांनी भरती शुल्क **रुपये १५०/-** इतकी रक्कम खालील विवरणात नमुद बॅक खात्यावर ऑनलाईन (इंटरनेट बॅकींग, फोन पे, गुगल पे ईत्यादी) अथवा ऑफलाईन स्वरुपात जमा करता येईल. धनादेश (Cheque) अथवा धनाकर्ष (DD) द्वारा शुल्क कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाही. तसेच सदर शुल्क हे ना-परतावा राहील.

**District Integrated Health & Family Welfare Society, Gadchiroli.**
**NPHCE**
**A/c No. 32755938462**
**IFSC Code - SBIN0015200**
**State Bank of India, Navegaon Branch, Gadchiroli**

४) रक्कम भरणा केल्यानंतर प्राप्त होणारा व्यवहार क्रमांक (Transaction ID) ऑनलाईन अर्जात नोंदविणे व व्यवहाराचा स्क्रीनशॉट (Screen shot) Online अर्ज भरतांना Upload करणे बंधनकारक आहे. त्यामुळे उमेदवारांनी सर्वप्रथम भरती शुल्काची रक्कम बॅकेत भरणा करावी. त्यानंतरच अर्ज भरण्याची कार्यवाही करावी. सदर व्यवहाराचा स्क्रीनशॉट (Screen shot) प्रिंट करुन निवड प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत उमेदवारांनी स्वत:जवळ काळजीपुर्वक जपून ठेवावा. तसेच त्याची १ प्रत अर्जासोबत सादर करावी.

५) **दिलेल्या तारखांना उपस्थित उमेदवारांच्या अर्जाशी निगडीत सर्व मुळ कागदपत्राची पडताळणी करण्यात येईल. त्यावेळी उमेदवारांनी सर्व नमुद कागदपत्रांच्या मुळ व स्वसाक्षांकित प्रती तसेच महाराष्ट्र नागरी सेवा**

**नियम २००५ अन्वये लहान कुटूंबाचे नमुना-अ प्रपत्र, अर्ज भरल्याबाबत उमेदवारांच्या ईमेल वर प्राप्त झालेला फार्मची प्रिंट तसेच भरती शुल्काच्या व्यवहाराचा स्क्रीनशॉट (Screen shot) ची प्रिंट इ. पडताळणी समितीसमोर सादर करणे बंधनकारक राहील.**

६) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनूसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे **दिनांक १७/०४/२०२३ रोजी** उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय ३८ वर्षे (राखीव प्रवर्गाकरीता कमाल वय ४३ वर्षे) राहील. परंतू वैद्यकिय अधिकारी (MBBS), स्पेशालिस्ट आणि सुपर स्पेशालिस्ट यांची सेवाप्रवेश व सेवासमाप्तीची वयोमर्यादा ७० वर्षे इतकी असून वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून प्राप्त केलेले शारीरीकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत व कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच पुढील प्रत्येक पुनर्नियुक्तीचे वेळी सदर प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

७) उमेदवाराने अधिवास / राष्ट्रीयत्वाचे सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील व ते कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. शासन निर्णय दिनांक १३ जानेवारी २००९ नूसार खुला (अमागास), अनूसुचीत जाती/ अनूसुचीत जमाती प्रवर्ग वगळता इतर मागास प्रर्वगातील (VJ, NT, SBC & OBC) उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी दिनांक ३१ मार्च २०२४ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) वैध प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील व ते अर्जासोबत तसेच कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

८) भरती प्रकियेचे संपूर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती तथा जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

-स्वा/-
**अध्यक्ष**
**निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी, गडचिरोली**

-स्वा/-
**सदस्य सचिव**
**निवड समिती तथा**
**जिल्हा शल्य चिकित्सक**
**सामान्य रुग्णालय, गडचिरोली**

CIVIL SURGEON DISTT. GENERAL HOSPITAL, GADCHIROLI सत्यमेव जयते